CMYK

सायं.दैनिक

www.beedkisan.in

# बीड किसान

• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ■ वर्ष ६ ■ अंक १३७ ■ मंगळवार, दि. २२ सप्टेंबर, २०२६ ■ पोस्टल दिनांक २३ सप्टेंबर, २०२६ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.

BEED ■ Year-6 ■ Issue-137 ■ Tuesday 22 September, 2026 ■ Postal Date 23 September, 2026 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

## पुतण्याच्या त्रासाला कंटाळून वृद्धेची आत्महत्या

बीड (किसान न्युज): बेलुरा (ता. जि. बीड) येथे ६७ वर्षीय महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १६ सप्टेंबर रोजी पहाटे घडली. या प्रकरणी मृत महिलेच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीवरून तिच्या पुतण्यासह त्याच्या पत्नीविरुद्ध बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सततची शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याच्या धमक्यांमुळे मानसिक त्रास आणि भीती निर्माण झाल्याने महिलेने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. कालिदा होले (वय ६७ वर्ष) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. १५ सप्टेंबर रोजी रात्री सुमारास अंगद होले यांच्या घरासमोर त्यांचे चुलत भाऊ संतोष बाळू होले व त्यांची पत्नी रंजना संतोष होले आले. त्यांनी अंगद, त्यांची पत्नी सुलभा आणि आई कालिंदा यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी रंजनाने सुलभा यांचे केस धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या अंगद यांच्या हाताला रंजनाने चावा घेतल्याचे, तर संतोषने अंगद यांना मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेनंतर कुटुंबीय भीतीपोटी नातेवाईकाच्या घरी झोपण्यासाठी गेले होत. दरम्यान, १६ सप्टेंबर रोजी पहाटे सव्वापाचच्या सुमारास कालिंदा रघुनाथ होले यांनी राहत्या घरातील पत्र्याच्या लोखंडी पाइपला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात संतोष बाळू होले आणि रंजना संतोष होले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## एकाच चेहऱ्याला कंटाळलेले पदवीधर चव्हाणांना घरचा रस्ता दाखविणार?

# पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर; मराठवाड्याचा आमदार यंदा बदला सतीश चव्हाण यांनी असे पण काही दिवे लावले नाही!



बीड । किसान न्युज

**औरंगाबाद पदवीधर विधानपरिषद निवडणुकीची आजच प्रोग्राम घोषित झाला आहे. यामुळे राजकीय पक्षांची तयारी सुरू झाली आहे. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार म्हणून मागील तीन टर्म पासून राष्ट्रवादी काँग्रेसचे सतीश चव्हाण विजयी होत आहेत. मात्र या तीन टर्ममध्ये त्यांनी पदवीधरांसाठी काय काम केले, कोणते दिवे लावले असा प्रश्न उपस्थित करीत आ. सतीश चव्हाण यांना विरोध सुरू झाला आहे. यामुळे आता पदवीधर त्यांना घरचा रस्ता दाखविणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. तसेच सुनेत्रा पवार यांनी सतीश चव्हाण यांना परत उमेदवारी न देता नव्या चेहऱ्याला संधी द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे. पण महाविकास आघाडी चव्हाण यांना आव्हान देण्यासाठी कोणता उमेदवार रिंगणात उतरविणार याकडे लक्ष लागले आहे.**

विधानसभा निवडणुकीच्या नंतर जिल्हापरिषद, नगरपरिषद, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य मतदारसंघ विधान परिषद निवडणुकीनंतर आता राज्यातील ५ विधानपरिषद निवडणुकीच्या या रिंगणात अमरावती, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद या प्रमुख विभागांचा समावेश आहे. एकीकडे दुष्काळ, पाणी टंचाईचे सावट असताना दुसरीकडे निवडणुका लागल्यात. त्यामुळे आरोप प्रत्यारोपालाही धार येणार आहे. मराठवाडा पदवीधरचे मतदारसंघाचा विचार केला तर राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. सतीश चव्हाण यांनी सलग तीनवेळा विजयी होत वर्चस्व राखले आहे. मात्र आता बरेच राजकीय समीकरणे बदलली आहेत. याचा आ. सतीश चव्हाण यांना फटका बसणार का? अशी चर्चा सुरू आहे. तसेच यावेळी दुष्काळी परिस्थिती असताना यातच निवडणुकीची घोषणा झाल्याने लोकांमध्ये सरकारच्या विरोधात काहीसा रोष आहे. याचाही मतदानावर परिणाम होऊन आ. सतीश चव्हाण यांना फटका बसणार का अशी ही चर्चा आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसकडून आ. सतीश चव्हाण तीन टर्म पदवीधरांच्या नेतृत्व करण्याची संधी मिळाली पण त्यांनी पदवीधरांसाठी काय काम केले असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच पदवीधर मतदान करतात पण त्यांना याचा कोणताही फायदा मिळत नाही. तर सतीश चव्हाण हे केवळ निवडणुकीच्या काळात पदवीधरांना भेटतात अन् विजयी झाले की, गायब होतात. यामुळे त्यांच्या बाबतीत मोठा रोष व्यक्त केला जात आहे. चव्हाण यांनी त्यांच्या कार्यकाळात काय दिवे लावले असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शुन्य काम असल्याचे सांगत यावेळी सतीश चव्हाण यांना मतदार घरचा रस्ता दाखविणार असल्याचे बोलले जात आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख सुनेत्रा पवार यांनी सतीश चव्हाण यांना उमेदवारी न देता दुसरा उमेदवार द्यावा अशी मागणी करण्यात येत » पान २ वर

### या पाच आमदारांचा कार्यकाळ अंतिम टप्प्यात

**महाराष्ट्रात मुदत संपणाऱ्या पाचही आमदारांचा कार्यकाळ अंतिम टप्प्यात आला आहे. यामध्ये औरंगाबाद पदवीधरचे सतीश चव्हाण, पुण्याचे अरुण लाड आणि नागपूरचे अभिजीत वंजारी या ३ पदवीधर प्रतिनिधींचा समावेश आहे. तर अमरावतीचे किरण सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत आसगावकर या २ शिक्षक प्रतिनिधींचाही कार्यकाळ संपत आहे. या ५ जागा रिक्त होत असल्याने सर्वच पक्षांत उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी रस्सीखेच पाहायला मिळणार आहे.**

### असा आहे कार्यक्रम

**पदवीधर आणि शिक्षक विधान परिषदेच्या या निवडणुकीसाठी अर्ज प्रक्रिया २९ सप्टेंबर पासून सुरू होणार आहे. तर २३ ऑक्टोबर रोजी मतदान होईल. तर २७ ऑक्टोबर रोजी निकाल लागून पदवीधर आणि शिक्षकांचा कौल कोणाच्या बाजूने स्पष्ट होईल.**

# गायरानधारकांच्या शेतीवर गदा आणणारे प्रकल्प रद्द करण्यासाठी वडवणीत निवेदन

### उपळीतील १८ के.व्ही. महावितरण व पुसरा एमआयडीसी प्रकल्पाला गायरानधारकांचा विरोध; पीक पंचनामे व नुकसानभरपाईचीही मागणी

वडवणी । किसान न्युज

वडवणी तालुक्यातील गायरान जमिनीवर दीर्घकाळापासून प्रत्यक्ष शेती करून उदरनिर्वाह करणाऱ्या भूमिहीन व अनुसूचित जातीतील गायरानधारकांच्या शेती व उपजीविकेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गायरानधारकांना बेदखल न करता त्यांच्या ताबा व दाव्यांची कायदेशीर चौकशी करावी, अशी मागणी वडवणी महिला तालुकाध्यक्ष सागरताई इचके यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे. या निवेदनातील प्रमुख मागण्या असे आहे. मौजे उपळी येथील प्रस्तावित १८ के.व्ही. महावितरण प्रकल्प आणि मौजे पुसरा येथील प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्प रद्द करावा, अशी ठाम भूमिका गायरानधारकांनी घेतली आहे.वडवणी तालुक्यातील विविध गावांमध्ये अनेक भूमिहीन व अनुसूचित जातीतील कुटुंबे सन १९८१ पासून किंवा त्यापूर्वीपासून गायरान जमिनीवर प्रत्यक्ष शेती करीत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ही शेती » पान २ वर



# शिवाजीनगरचे पीआय बल्लाळ ॲक्शनमोड मध्ये कारवायांच्या धडाक्याने खाकीचा धाक निर्माण










### अवैध दारू, रस्त्यावर वाढविस अन् डीजे विरोधात धडक कारवाई

बीड । किसान न्युज

शहरातील शिवाजीनगर पोलीस ॲक्शनमोड मध्ये दिसत असून, दोन दिवसांत अनेक कारवाया करीत त्यांनी खाकीचा चांगलाच धाक निर्माण केला आहे. यामध्ये त्यांनी अवैध दारू वाहतूक, रस्त्यावर वाढदिवस साजरा कलणारे तसेच डीजेचा दणदणाट करणाऱ्यावर कारवाई केली आहे. या कारवायांचे जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे.

पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्यात लोकाभिमुख पोलिसींगचा अनुभव सामान्य बीडकरांना येत असून, त्यांची चौफेर नजर असून, चुकीला माफी नाही असा इशारा कामातून बल्लाळ यांनी दिला आहे. रविवारी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत ग्रामीण भागात अवैधरित्या विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या एकास ताब्यात घेतले असून या कारवाईत एकूण १ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी रवींद्र भाऊसाहेब बहीर याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच सध्या रस्त्यावर वाढदिवस साजरा करुन वाहतुकीला अडथळा आणि हुल्लडबाजी केली जात आहे. याचा रस्त्यावरुन वावरणाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. याच पार्श्वभूमीवर ११२ च्या कॉलची दखल घेत घटनास्थळी पथकाने जाऊन ५ जणांना ताब्यात घेतले आहे. तसेच सध्या डीजेचा मुद्दा राज्यात गाजत असून, गणेशोत्सव काळात नो डीजेचा इशारा पोलीस अधीक्षक यांनी दिला आहे. अशा परिस्थितीत शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत लग्नात डीजेचा दणदणाट सुरू होता. याची माहिती मिळताच पोलीस पथकाने धाव घेत डीजे जप्त करुन » पान २ वर

# टाकरवणच्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या मॅनेजरकडून पीक कर्ज वाटपात शेतकऱ्यांची जाणीवपूर्वक पिळवणूक

### ■ ऊसाचा पीकपेरा नोंद नाही म्हणून कर्ज माफ झालेल्या रकमे पेक्षा पन्नास टक्केच रक्कमेस देत आहे मंजुरी

टाकरवण । किसान न्युज

माजलगाव तालुक्यातील टाकरवण येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखाधिकार्याकडून ऊस पिकाला पीक कर्ज देण्यास अडवणूक करण्यात येत असल्याने दुष्काळात शेतकऱ्यांना त्रास देण्याचे काम शाखाधिकारी करत आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की सध्या शासनाकडून कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर येत असतानाच मागील वर्षी ज्या शेतकऱ्यांनी ऊस या पिकावर कर्ज घेतले आहे तसेच यावर्षी सुद्धा त्याच्या शेतात ऊस उभा आहे तरीसुद्धा संबंधित शाखाधिकारी पीक पेऱ्याची अट फक्त ऊसालाच घालत असून कर्ज देत नसल्याने स्पष्ट सांगत आहे आमचे प्रतिनिधी व इतर शेतकरी बँकेमध्ये शाखाधिकार्यांची भेट घेतली असता त्यांनी सांगितले की उसावर कर्ज पाहिजे असेल तरी पीक पाणी करा शेतकरी एक पीक पाणी सुद्धा करत आहेत परंतु ही पीक पाणी करू नये सातबारा वरती एक पीक पाणी केल्याचे दाखवत नाही हा मुद्दा संपूर्ण महाराष्ट्रात सुरू असताना तसेच संबंधित शाखाधिकार्याला शेतकरी ऊसाची हमीपत्र देत आहेत तसेच प्रत्यक्ष शेतात उसाची पाहणी करण्याची विनंती करत आहेत तरीसुद्धा शाखाधिकारी मला पाहणी करण्यासाठी वेळ नसल्याचे कारण सांगून इतर » पान २ वर

# पालकांनी शाळेसाठी वेळ द्यावा : रणवीर पंडित

### शारदा ज्ञानोत्सवातील वादविवाद स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



गेवराई । किसान न्युज

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत आणि सर्वांगीण विकासात शाळेसोबतच पालकांचाही मोलाचा वाटा असतो. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांसाठी तसेच शाळेसाठी थोडा वेळ द्यावा, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची व वर्तनाची नियमित चौकशी करावी. पालकांनी दिलेला वेळ विद्यार्थ्यांच्या विकासाला निश्चितच बळ देतो, असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित 'शारदा ज्ञानोत्सव २०२६' अंतर्गत माध्यमिक विद्यालय, रामपूर येथे मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक शंकरराव तौर, शनैश्वर पतसंस्थेचे चेअरमन अनिरुद्ध तौर, सरपंच अरुण तौर, सरपंच उमेश आर्दड, सरपंच दिगंबर खरात, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष मस्के, सतीश पवार, संदिपान मस्के, बळीराम मस्के, महादेव आंभूरे, सुभाष पवार, भुजंग पवार, खुशाल शरणांगत, शाम माने तसेच » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

9850643058

सोने २४ कॅरेट 150,000

२२ कॅरेट 140,000

चांदी प्रतिकिलो 238,000

# अंबाजोगाईत घरफोडी; दागिने, रोख रक्कम लंपास

### घर बंद असल्याचे पाहून चोरट्यांनी केला हात साफ

अंबाजोगाई । किसान न्युज

घराला बाहेरुन कुलूप पाहून संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घरफोडून दागिने, रोख रक्कम असा मोठा ऐवज लंपास केल्याची घटना आज सकाळी अंबाजोगाई शहरात उघडकीस आली आहे. ही घटना नंदलाल नगर येथे घडली असून याप्रकरणी पोलिसात अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील कपड्यांचे प्रसिद्ध व्यापारी गुलाबचंद सारडा हे शहरालगत असलेल्या नंदलाल नगर येथे वास्तव्यास आहेत. ते काही कामानिमित्त पूर्ण कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. घराला बाहेरुन कुलूप होते. यामुळे घरी कोणीच नसल्याची » पान २ वर

सन १९९७

GST IN : 27AEOFS1029R1ZA

Mo : 7057772777, 9970601769, 7757097717

सिमा मशीन टुल्स



ingco BOSCH DEWALT shakti FORTE KPT CLIF TALI SKF AM-FOUR CROSS BEE SUPER STEEL TEZZ ARIT

चांद कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड.

# सीएस सोळंके यांनी एक्स-रे प्रिंटींग मशीन दुरुस्त करून रुग्णांची अडचण दूर करावी

### मोबाईल मध्ये फोटो काढून डॉक्टरला दाखवायला सांगता, स्मार्ट मोबाईल नाही त्यांनी काय करायच?





बीड । किसान न्युज

येथील जिल्हा रुग्णालयातील कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली एक्स-रे रिपोर्ट प्रिंटिंग मशीन बंद असल्याने रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे समोर आले आहे. मशीनमधून रिपोर्टची प्रिंट मिळत नसल्याने काही कर्मचाऱ्यांकडून रुग्णांना मोबाईलमध्ये एक्स-रेचा फोटो काढून तो डॉक्टरांना दाखविण्याचा सल्ला दिला जात असल्याची तक्रार आहे.

मात्र, प्रत्येक रुग्णाकडे स्मार्ट मोबाईल असेलच असे नाही. काही रुग्णांकडे साधा मोबाईल असू शकतो, तर काही आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांकडे मोबाईलही नसतो. अशा रुग्णांनी एक्स-रे डॉक्टरांना कसा दाखवायचा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासकीय रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व सर्वसामान्य नागरिकांना योग्य सुविधा उपलब्ध करून देणे » पान २ वर

# बीड शहरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट

### आठ दिवसात कारवाई न झाल्यास नगर पालिकेत भटके कुत्रे आणून सोडणार : इमरान जागीरदार



बीड । किसान न्युज

बीड शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, नागरिकांना कुत्रे चावण्याच्या घटना घडत असल्याने शहरवासीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सकाळ-संध्याकाळी रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरातील विविध भागांत भटक्या कुत्र्यांचे टोळके फिरताना दिसत असून, रस्त्यांवरून जाणाऱ्या नागरिकांच्या मागे धावणे, वाहनांचा पाठलाग करणे तसेच नागरिकांवर झडप घालण्याच्या घटना घडत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. काही ठिकाणी कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे नागरिकांना उपचारासाठी रुग्णालयात जावे लागल्याचेही समोर आले आहे. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबाबत नागरिकांकडून नगरपरिषद प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करण्यात येत असतानाही या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

» पान २ वर

CMYK